
# अमेरिका-इराण शांतता करारानंतरही तणाव कायम!

## होर्मुझ 'मध्ये ६० दिवसांनंतर जहाजांवर शुल्क आकारणार, इराणचा अमेरिकेला इशारा

**महाईन्यूज । पॅरिस**

**अमेरिका आणि इराण यांच्यात दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर अखेर अंतरिम शांतता करारावर स्वाक्षऱ्या झाल्या असल्या, तरी दोन्ही देशांतील तणाव अद्याप कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. करारानंतर इराणने अमेरिकेवर जोरदार टीका करत हा करार "अमेरिकेच्या अपयशाचा दस्तऐवज" असल्याचा दावा केला आहे. त्याचवेळी होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या व्यापारी जहाजांकडून ६० दिवसांनंतर शुल्क आकारले जाईल, असा इशाराही इराणने दिला आहे.**





इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर गालिबाफ यांनी राज्य माध्यमांशी बोलताना सांगितले की, हा करार इराणच्या राजनैतिक भूमिकेचा विजय असून अमेरिकेला आपल्या अटी मान्य कराव्या लागल्या आहेत. त्यामुळे हा करार अमेरिकेच्या अपयशाची नोंद करणारा दस्तऐवज असल्याचे त्यांनी म्हटले. "इतिहास या कराराकडे अमेरिकेच्या अपयशाच्या उदाहरणाप्रमाणे पाहील. इराणने आपल्या राष्ट्रीय हितांशी कोणतीही तडजोड केलेली नाही," असे गालिबाफ यांनी स्पष्ट केले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी स्वाक्षरी केलेल्या १४ कलमी अंतरिम करारानुसार दोन्ही देशांमध्ये तात्काळ युद्धविराम लागू करण्यात आला आहे. तसेच होर्मुझ सामुद्रधुनीतून व्यापारी जहाजांची वाहतूक पुन्हा सुरू करण्यासाठी विशेष आराखडा तयार करण्यात आला आहे. या करारानुसार सुरुवातीच्या ६० दिवसांपर्यंत कोणत्याही जहाजाकडून शुल्क आकारले जाणार नाही. या कालावधीत कायमस्वरूपी करारासाठी दोन्ही देशांमध्ये पुढील वाटाघाटी होणार आहेत.

मात्र, ६० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर करणाऱ्या व्यापारी जहाजांकडून शुल्क आकारण्यात येईल, असे गालिबाफ यांनी स्पष्ट केले. "होर्मुझ सामुद्रधुनी खुली राहील; मात्र ती पूर्वीसारखी मोफत राहणार नाही. या महत्त्वाच्या सागरी मार्गावर इराणचा सार्वभौम अधिकार असून त्यानुसार आम्ही शुल्क आकारू," असे त्यांनी सांगितले.

इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाघेई यांनी सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षा इराण व ओमान संयुक्तपणे सांभाळतील. अंतिम करारामध्ये इराणच्या तेल निर्यातीवरील निर्बंध, सागरी विमा, आंतरराष्ट्रीय महसूल आणि व्यापारी वाहतुकीशी संबंधित मुद्द्यांवरही तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अमेरिकेने टप्प्याटप्प्याने नौदल नाकेबंदी हटविणे आणि इराणचा गोठवलेला निधी मुक्त करण्याची प्रक्रियाही सुरू करण्याचे मान्य केले असल्याची माहिती इराणी अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### करारानंतरही इराणची आक्रमक भूमिका

शांतता करारानंतरही इराणने मवाळ भूमिका न घेता होर्मुझ सामुद्रधुनीवरील आपला अधिकार ठामपणे मांडला आहे. ६० दिवसांनंतर या मार्गाने जाणाऱ्या व्यापारी जहाजांकडून शुल्क आकारले जाईल, अशी घोषणा करत इराणने अमेरिकेलाही अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. इराणी नेतृत्वाने हा करार "अमेरिकेच्या अपयशाचा दस्तऐवज" असल्याचा दावा करत पुढील वाटाघाटींमध्येही कठोर भूमिका कायम ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

# पायलट शुभम कुमार शहीद होताच पत्नी २१ लाखांचा चेक घेऊन पसार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय हवाई दलाचे पायलट फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार हे विमान अपघातात शहीद झाल्यानंतर आता त्यांचे कुटुंबीय आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शुभम हा कुटुंबातील एकमेव कमावता व्यक्ती होता, त्याच्या अचानक जाण्याने आता कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे, अशी प्रतिक्रिया शुभम कुमार यांचे वडील अमरेंद्र शर्मा यांनी दिली.**





### आसाम येथे कोसळले विमान

शनिवारी आसाममधील जोरहाट येथील भारतीय हवाई दलाच्या तळावर उतरत असताना रशियन बनावटीच्या 'अँटोनोव्ह एएन-३२' या विमानाचा अपघात झाला. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला होता. ज्यात दोन अधिकारी आणि दोन अग्निवीरांचा समावेश असल्याची माहिती हवाई दलाने दिली. या दुर्घटनेत स्क्वॉड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर खेमाराम कुमावत आणि अग्निवीर दानिश आलम हे ठार झाले. या विमानात एकूण सहा जण होते. विमानाचा सह-वैमानिक जखमी झाला असून त्याला जोरहाट येथील लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यातच नुकसान भरपाईपोटी मिळालेला २१ लाख रुपयांचा धनादेश घेऊन शुभम कुमार यांच्या पत्नीने पळ काढल्यामुळे कुटुंब धक्क्यात आहे.

शुभम कुमार यांच्या मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्या पत्नी श्रेया राय या आझमगडहून बिहारला आल्या. त्यांनी शुभम कुमार यांच्या अंत्ययात्रेत सहभाग घेतला. पण त्यानंतर जे झाले, त्याने शुभमच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.

जागरण या वृत्त संकेतस्थळाने दिलेल्या माहितीनुसार, हुलासगंजचे सीओ यांनी श्रेया राय यांना २१ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला होता. शुभम यांचे वडील अमरेंद्र शर्मा यांना ही बाब कळल्यानंतर त्यांनी सीओंना याबाबत विचारले असता त्यांनी धनादेश पत्नीकडे दिल्याचे सांगितले.

अमरेंद्र शर्मा म्हणाले, "जर माझ्या मुलाने श्रेयाशी लग्न केले असेल तर तिला धनादेश दिला असावा, याला आमची हरकत नाही. पण धनादेश मिळताच ती निघून गेली. ती आमच्याबरोबर थांबून आम्हाला धीर देऊ शकली असती. श्राद्ध होईपर्यंत तरी तिने थांबायला हवे होते. पण सीओ आणि श्रेया यांनी मला धनादेशाबाबत अंधारात ठेवले."

शुभम कुमार यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम आणि श्रेया एकमेकांवर प्रेम करत होते. दोन्ही कुटुंबीयांनी त्यांच्या लग्नाला परवानगी दिली होती. यावर्षी नोव्हेंबर महिन्यात त्यांचा विवाह होणार होता. मात्र शुभम यांच्या आजीचे निधन झाल्यामुळे लग्न पुढील वर्षी ढकलले गेले.

तत्पूर्वी दोघांनी नोंदणी पद्धतीने विवाह केल्याचे बोलले जात आहे. मात्र शुभमच्या कुटुंबीयांनी याबद्दल माहिती नसल्याचे सांगितले. अमरेंद्र शर्मा यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे. मुलाच्या अकस्मात मृत्यूमुळे कुटुंब अडचणीत सापडले असून आम्हाला मदत आणि न्यायाची अपेक्षा आहे, असे वडिलांनी सांगितले.